दिनांक १९/११/२०२४

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १८/११/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

एकुण गुन्हे :- २१ उघडकीस :-

### जबरी चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपी अटक आहे/ नाही | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक ९९०/२०२४ कलम ३०९ -४, ३५२, ३५१-३, बी एन एस | कलम ३९४, ५०४, ५०६ भा.द.वी. | तीरूमला कॉलनी जवळ अम | दि १७.११.२०२४ चे १५..३० वा<br><br>दि १८.११.२०२४ चे ०१.२५ वा | दीनेश हनुमानदास गांधी वय ५० रा तीररूमला कॉलनी तुळजा भवानी मंगल कांयालय जवह अम | श्रेयश उर्फ पप्पी पटेल वय २० रा तपोवन नेताजी नगर अम | नाही | १,५२,००० रू मोबाइल | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी दी १७.११.२०२४ रोजी ०३.३० वा मी माझ्या घरून मगल कांयालय येथे टु व्हीलर क एम एच २७ ४०६० नी जात होतो त्याचवेळी तीरूमाला कॉलनीच्या जवळ माझ्या मुलाचा मीत्र पप्पी पटेल हा टु व्हीलरवर आला व त्याने मला थांबवीले व म्हटले की तु कीष्णा गांधी का बाप है ना रूख असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करुन त्याच्या जवळील चाकु काढुन मला चाकु चा धाक दाखवीला व माझ्या जवळील सॅमसंग गॅलक्सी फोल्ड ६ कंपनीचा मोबाइल की अं १,५२,००० रू मोबाइल हीसकावुन घेतला व तसेच त्याने मला धमकी दीली की तुने मेरी रीपोर्ट दीया तो मै तुझे और तेरे लडके को जानसे मार दुंगा असे म्हणुन श्रेयस ऊर्फ पप्पु पटेल नी माझ्या जवळील मोबाइल चाकु चा धाक दाखवुन पळुन गेला वरून सदर चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक ९९३ /२०२४ कलम ३०९, ४,३(५) बी एन एस | कलम ३९४, ३४ भा.द. वी. | आशियाड काँलनी रेणुका कलेक् क्शन् ा जवळ स्टेशनरी दुकान समोर अम | दि १८.११.२०२४ चे १८.५५ वा दि १८.११.२०२४ चे २१.४८ वा | एक महीला रा. अमरावती | दोन अज्ञात इसम | | सोन्याचे मंगळसुत्त्र वजन २४१/२ ग्र्. किं. अं. १,२४,८०० /- | हकीकत अशा प्र्कारे आहे की, फि. हे स्टेशनरी साहित्य घेवुन यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फि. ही उभी दोन चाकी वाहन जवळ जात असता मो.सा. काळया रंगाची घेवुन यातील आरोपी यांनी फि.चे ग्ळयातील सोन्याचे मंगळसुत्र वजन २४१/२ ग्र्. किं. अं. १,२४,८०० /- चे चैन सह ओढुन तोडुन चोरुन नेली त्यातील मागच्या इसमाने काळया रंगाचे श्र्ट घातलेले होते. अशा फि.चे ज. रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३ . | पोस्टे राजापेठ अप. क्रं. ६९३/२४ कलम ३०९(४), ३(५) भान्यास | कलम ३९४, ३४ भा.द. वी. | फरशी स्टाँप चौक इंडीयन आँईल पेट्रोलपंप समोर अमरावती शहर | दि. १८/११/२४ रोजी चे १९.३० वा दरम्यान<br><br>दा. ता. वेळ १८/११/२४ रोजी २१.२९ वा | एक महीला रा.अमरावती | अज्ञात | नाही | सोन्याचे मंगळसुत्र १३ ग्रँम वजनाचे कि अ ५००००/-रुपये | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी ही त्यांच्या मुलीला त्यांचे घरी सुभाष कॉलनी फरशी स्टाँप येथे भेटायला गेली होती त्यानंतर पायी फरशी स्टाँप येथुन फिर्यादी यांनी भाजीपाला घेतला त्यानंतर अंदाजे रात्री ०७.३० वाजता दरम्यान फरशी स्टाँप येथे फिर्यादी यांचे पती घ्यायला आले होते फि व फि चे पती असे फरशी स्टाँप येथे उभे असतांना एका काळया रंगाचा पल्सर मोटर सायकल स्वार दोन अनोळखी इसम याने फि चे गळयाला हिस्का देऊन गळयातील सोन्याचे मंगळसुत्र १३ ग्रँम वजनाचे कि अ ५००००/-रुपये जबरीने हिसकावुन तोडुन दोघे मोटर सायकल स्वार कंवर नगर चौकाच्या दिशेने पळुन गेले.अशा फिर्यादीच्या बयाण वरून सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |

## चोरी :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपी अटक आहे/ नाही | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र.७२१ /२०२४ कलम ३०५(ब) भा.न्या.सं. | पो.उपा. परि.०१ अमरावती शहर | बस डेपो बडनेरा अमरावती शहर | घटना ता.वेळ - दि.१८.११.२०२४ चे १३.३० वा. दाखल ता.वेळ - दि.१८.११.२०२४ चे १९.२५ वा. | एक महीला रा.बुलढाणा | अज्ञात महिला | नाही | सोन्याची पोत १५ ग्रँम कि.अं. ३०,०००/- रु. व ०३ ग्रँमचे कानातले टापसे कि.अं. ५०००/- रु. एकुण ३५,०००/- रु. | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फि.ही नमुद ठिकाणी राहत असुन तिच्या माहेरी वाघोडा ता.नांद.खंडे.जि.अम.येथे आली होती. दि.१८.११.२०२४ चे १२.३० वा. तिच्या भावजाया व दोन मुलांसह चिखली येथे जाण्याकरिता निघाली होती. त्यावेळेस फि.च्या मोठ्या पर्स मध्ये लहान पर्स होती. ज्यामध्ये सोन्याची पोत १५ ग्रँमची व ०३ ग्रँमचे कानातले टापसे ठेवलेले होते. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फि.ही अकोला च्या बस मध्ये बसत चढत असतांना तेथे खुप गर्दी होती. त्यावेळेस एक महिला फि.जवळ आली होती. नंतर बसमध्ये बसल्यावर फि.ने पर्स चेक केली असता पर्सची चैन अर्धवट उघडी दिसली. व त्यामध्यील लहान पर्स दिसुन आली नाही. एक अज्ञात महिलेने पर्समधुन लहान पर्स ज्यामध्ये सोन्याची पोत व टापसे हे काढुन चोरुन नेले अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

## ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपी अटक आहे/ नाही | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप.न. ९७७ /२०२४ क. ४,२५ आर्म अँक्ट . | कलम ४,२५ आर्म कायदा | न्यु फॉरेस्ट कॉलनी अमरावती | घटना ता वेळ - दि. १८/११/२०२४ चे ००/२० वा. दाखल ता वेळ दि. १८/११/२०२४ चे रात्री ०२/५८वा. दरम्याण | सरतर्फे पोहेकाँ सुभाष मारोतराव पाटील ब न १२८० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | संतोष पुंडलिकराव पुंड वय२५ वर्ष रा. माळीपुरा नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | नाही | | यातील फिर्यादी हे पोलिस स्टॉप सह पोस्टे हद्दीत गुन्हे शोध पथकासह रात्र पाळी ड्युटी वर असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाली की एक इसम न्यु फॉरेस्ट कॉलनी छत्री तलाव रोड परीसरात चाकु काढुन फिरत आहे अशा माहीती वरून सदर बातमीची शहानिशा करून नमुद पंचाना घटनास्थळी बोलावुन घटनास्थळाची पाहनी केली असता एक इसम संशयीत रित्या बजाज पल्सर गाडी सह उभा दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव संतोष पुंडलिकराव पुंड वय२५ वर्ष रा. माळीपुरा नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती असे सांगतिले त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कंबरेला एक चाकु ज्याची कि. १००/- रू व त्याच्या ताब्यात असलेली बजाज प्लसर गाडी एम एच२७सीटी ६२१७ कि. अंदाजे ५००००/- रूचा ताब्यातुन जप्त करण्यात आले आरोपीचे कृत्य कलम ४,२५आर्म अँक्ट प्रमाणे होत असल्याने अश्या |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | फि.च्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अप नं. ९८७/२०२४ कलम १३५ मपोका सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट | कलम १३५ म.पो.का. सहकलम ४,२५ आर्म कायदा | साहु बाग अम येथे सार्वजनीक ठीकानी आम रोड वर अमरावती | दि. १७.११.२४ चे २२.०० वा.<br><br>दाखल दि.१८.११.२४ चे ००.०९ वा. | पोहेकॉ इशया खांडे बनं १२०५ विशेष पथक गुन्हेशाखा अम | जय अनील जगताप वय २० रा शीवनगर वीलास नगर मागे अम | नाही | | यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी गुप्त माहिती वरुन घटनास्थळी जावून शहानिशा केली असता यातील तडीपार आरोपी नामे जय अनील जगताप वय २० रा शीवनगर वीलास नगर मागे अम हा हातामध्ये एक लोखंडी पात्याची तलवार हातात घेवुन फीरतांना मीळुन आल्याने नमुद आरोपीने कृत्य कलम १३५ म पो का सह कलम ४/२५ आर्म अक्ट प्रमाणे गुन्हा होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३ | पो.. स्टे. खोलापुरीगेट 265/24 कलम 296, 351(2) BNS | कलम २९४,५०४ भा.द.वी. | दत्तुवाडी अमरावती | 18/11/2024 चे 19-30 वा. दाखल ता. वेळ 18/11/2024 चे 22-19 वा. | एक महिला | 1)गजानन शंकरराव दहातोंडे वय 45 वर्ष रा. दत्तुवाडी अमरावती 2) दोन अनोळखी इसम | समजपत्र ावर रीहा | | यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीतांनी दि. 17/11/2024 रोजी झालेल्या भांडणाचे कारणावरुन फिर्यादीचे घरासमोर येवुन अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तुझ्या नव-याला दिसु दे त्याला पाहतो अशी धमकी दीली अशा रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

**अपघात :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपी अटक आहे/ नाही | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पे.स्टे. बडनेरा अप क्र ७१९/२४ कलम २८१,१२५ (b)भ न्यासहक लम १३४,१७ ७,१८५मो पका | कलम २७९,३ ३७,भा. द.वी. सह कलम १३४, १७७, १८५, मो. वा. कायदा | नागपुर सुपर हायवे पुलाख ाली | दि.१७/११/२० २४ चे २२/३० वा ते २२/४५वा दरम्य ान<br><br>दाखल ता वेळ- १८/११/२०२४र ोजी चे ०१/३७ वा | कार्तीक कैलाश अंबाडारे वय- २२वर्षे रा-खेड पिपरी ता.नांदगाव खंडेश्वर जि अमरावती | ट्रक क्र.MH४०BL ९३८५चालक चेतन अश ोकराव पुतळे वय-२७वर्षे रा-कोठोडा ता.नांदगाव खंडेश्वर जि अम | नाही | | हकीकत अशा प्रकारे आहे की, सदर ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील टाटा कंपनीचा ट्रक एम एच ४० बी एल ९३८५ हा ट्रक दारुच्या नशेत निष्काळजीपणे व जोराने चालवत आणुन आमच्या गाडीला मागच्या बाजुला ठोस मारली आणी आमच्या गाडीचे अंदाजे ५०,०००/-रु. चे नुकसान केले तसेच फि च्या बहीणीच्या व तिच्या मुलाच्या दुखापतीस कारणीभुत झाला त्यामुळे ट्रक चालकाविरुध्द फिर्यादी च्या रिपोर्ट वरुन जखमीच्या मेडीकल सर्टीफिकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

**प्रोव्हिशन :-**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अमरावती | अप क्र.९७८/ २०२४ कलम ६५ (इ) मदाका | अवैद्यरीत्या दारु विक्री | आरोपीचे राहते घरा समोर संजय गांधी नगर नं.२ अमरावती | दि.१८/११/२०२४ चे १०.३० वा दरम्याण | दि.१८/ ११/२० २४ चे १२.०० ८ वा | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | सुनिल दंन्तोपंत आठवले वय५३ वर्ष रा. संजय गांधी नगर नं.२ अमरावती | | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे विधानसभा आगामी निवडणुक अनुषंगाने पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली वरुन पंचासह घटनास्थळी जावुन आरोपीवर रेड केली असता आरोपीचे ताब्यातुन १३ नग १८० एम एल च्या देशी दारु संत्रा बॉबी कंपनीची प्रती नग ८०/-रु प्रमाणे १०४०/-रु चा माल आरोपीच्यो ताब्यातुन जप्त केला, वरुन फिर्यादीचे लेखी रिपोंट वरुन गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २ | नांदगाव पेठ | अप.क्र.४ ४३/२०२ ४ कलम ६५ (ई) म.दा.का. | अवैध्यरित्या दारु विक्री करणे | ग्राम टाकळी जहागीर | दि.१८/११/२४ चे १३-४५ वा | दि.१८/ ११/२ ४ चे१६- ३६ वा | सरतर्फे पोउपनि खंडारे सा पो. स्टे. नांदगाव पेठ | एक महीला समजपत्रा वर रिहा | सरतर्फे पोउपनि खंडारे सा पो. स्टे. नांदगाव पेठ | हकीकत अशाप्रकारे आहे की नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी सोबत स्टॉंफ सह प्रो. रेड ड्युटी वर असतांना गुप्त बातमी दाराकडुन माहिती मिळाली की एक महिला अवैद्यरित्या गा.हा.भ.दारु काढत आहे. अशा माहिती वरुन रेड केली असता तिच्या ताब्यातुन ६० लीटर गा. हा. भ. दारु कि. ६०००/-रु साहित्य कि अं १००००/-रु. एकुन १६०००/-प्रो.माल जप्त केला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| ३ | पोलील स्टे ेशन गाडगेनगर अमरावती शहर | अप. क्रमांक ९८८/२४ कलम- ६५ इ मदाका | प्रोव्हि. | र्हषराज कॉलनी जवळ अमरावती | दि. १७.११.२०२४ चे २३.०० वा | दि. १८.११.२०२४ चे ००.४० वा | पोहेका भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अम | सुरज प्रभाकरराव मेश्राम वय ३२ रा शोभा नगर दुर्गा माता मंदीर मागे अमरावती समजपत्र | पोहेका भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अम | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकानी यातील फिर्यादी यांची पोस्टे हद्दी मध्ये पेट्रोलिंग सुरु असतांना गृप्त बातमीदार कडुन माहीती मिळाल्यावरुन नमुद ठिकानी पोस्टे स्टाफ सह फिर्यादी हे गेले असता नमुद आरोपी हा हातात बॅग घेवुन पायदळ जातांना दिसला आम्ही सरकारी वाहन रोडणे बाजुला थांबुन पायदळ जाणा-या इसमा जवळ जावुन बॅगची पाहनी केली असता त्यात इमपीयर ब्लु कंपनीच्या विदेशी दारू १८० एम एल काचेच्या बॉटल एकुन १२ प्रेत्यकी की. १६०/-रु. एकुन कीमंत १९२०/-रू चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात येवुन गुन्हा दाखल करण्यात येवुन तपासात घेतला. |
| ४ | पोलील स्टे ेशन गाडगेनगर अमरावती शहर | अप.क्रमांक ९८९/२४ कलम- ६५ ई मदाका | प्रोव्हि. | नवसारी रोडणे आठवण रेस्टॉरेन्ट जवळ अमरावती | दि. १७.११.२०२४ चे २२.१० वा | दि. १८.११.२०२४ चे ००.५७ वा | पोहेका भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अम | सुधीर देवीदास नागले वय ४५ रा महात्मा पफुले नगर नवसारी अम समजपत्र | पोहेका भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अम | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी यांची पोस्टे हद्दी मध्ये पेट्रोलिंग सुरु असतांना गृप्त बातमीदार कडुन माहीती मिळाल्यावरुन नमुद ठिकानी पोस्टे स्टाफ सह फिर्यादी हे गेले असता नमुद आरोपी वर प्रो रेड करण्यात आली असता त्यांचे जवळील खाकी खोक्याची पाहणी केली असता त्यात देशी बॉबी संत्रा कंपनीच्या ९० एम एल प्लॉस्टीक बॉटल च्या एकुन नग ४० की अं १४००/- रू चा मीळुन आल्याने त्याला दारू बाळगण्याबाबत परवाना वीचारला असता नसल्याची सांगीतले वरून सदर चा गुन्हा दाखल कररून तपासात घेतला |
| ५ | पोलील स्टे ेशन गाडगेनगर अमरावती शहर | अपक्र. ९९१ /२४ कलम- ६५ ई मदाका | प्रोव्हि. | सुरुची बार समोर राठी नगर अमरावती | दि. १८.११.२०२४ चे १३.३० वा | दि. १८.११.२०२४ चे १८.३० वा | पोहेका मनोजकुमार ठोसर ब.न.५७६ गु.शाखा अम | रोशन सुर्यभान वाटकर वय १९ वर्ष. रा. जयसियाराम नगर अम. समजपत्र | पोहेका मनोजकुमार ठोसर ब.न.५७६ गु.शाखा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकानी यातील फिर्यादी यांची पोस्टे हद्दी मध्यये पेट्रोलिंग सुरु असतांना गृप्त बातमीदार कडुन माहीती मिळाल्यावरुन नमुद ठिकानी पोस्टे स्टाफ सह फिर्यादी हे गेले असता नमुद आरोपी वर प्रो रेड करण्यात आली असता त्यांचे जवळील प्लॅस्टीक पोत्याची पाहणी केली असता त्यात रॉयल स्टॅग कंपनीचा १८० एम.एल |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | अम | च्या ३२ नग प्रत्येकी १९०/-रु ६०८०/- रु चा मीळुन आल्याने त्याला दारू बाळगण्याबाबत परवाना वीचारला असता नसल्याची सांगीतले.वरून सदर चा गुन्हा दाखल कररून तपासात घेतला |
| ६ | पोलील स्टे ेशन गाडगेनगर अमरावती शहर | अपक्. ९९२/२४ कलम-६५ ई मदाका | प्रोव्हि. | संत गाडगेबाबा समाधी समोर अमरावती | दि. १८.११.२०२४ चे १८.००वा | दि. १८.११.२०२४ चे २०.११ वा | पोहेका भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अम | सुमित हिरोज मोहोड वय २५ वर्ष. रा. सिदार् नगर अमरावती समजपत्र | पोहेका भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अम | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकानी यातील फिर्यादी यांची पोस्टे हद्दी मध्यये पेट्रोलिंग सुरु असतांना गृप्त बातमीदार कडुन माहीती मिळाल्यावरुन नमुद ठिकानी पोस्टे स्टाफ सह फिर्यादी हे गेले असता नमुद आरोपी वर प्रो रेड करण्यात आली असता त्यांचे जवळील एका थैलीमधे विदेशी दारु एम.सी डॉलर नं.१ कंपनीचा १८० मिली च्या १२ नग सिलबंद बाँटल प्रत्येकी १६०/-रु प्माणे १९२०/-रु तसेच दुस-या थैलीत ऑफिसर चाईस ब्लु कंपनीचा १८० मिली च्या १९२०/-रु असा एकुण ३८४०/-रु चा माल मीळुन आल्याने त्याला दारू बाळगण्याबाबत परवाना वीचारला असता नसल्याची सांगीतले.वरून सदर चा गुन्हा दाखल कररून तपासात घेतला |
| ७ | पो ठाणे सि टि कोतवाली | अप क्र.४५०/२४ कलम ६५(ई) मदाका | प्रोव्हि. | राजकलम चौक अमरावती | दि.१७.११.२४ चे २२.५० वा. | दि.१८.११.२४ चे ०१.३७ वा. | सरतर्फे ASI रंगराव जाधव ब.नं. ९२१ पो स्टे सिटी कोतवाली अम | गणेश रामविलासजी पुरोहीत वय ४५ वर्ष रा. चांदुर बाजार अमरावती समजपत्रावर रिहा | | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह विधानसभा निवडणुक अनुशंगाने मा. वरिष्ठाचे आदेशाने राजकमल चौक येथे ऑलआऊट नाकाबंदी करत असता नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी सदर आरोपीची गाडी थाबंवुन पाहणी केली असता नमुद गाडीचे मागील डीक्की मधुन १) BLENDERS PRIDE १ नग ७५० ML कि.अं. १८००/ रु, २) BLACK/WITE१ नग ७५० ML कि.अं. २६००/ रु, ३) WILLIAM LAWSONS १ नग ७५० ML कि.अं. १८००/ रु, ४) BLACK/DOG१ नग ७५० ML कि.अं. ३०६०/ रु,एकुण कि. ९२३०/- रु. व पांढऱ्या रंगाची मारोती सुझुकी सियाज कंपनीची चार चाकी गाडी क्र. MH ३१ AU ९५८६ कि ५,००,०००/ रु असा एकुण ५०,९२३०/- रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने त्यास सदर मालाबाबत परवाना |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले .सदर आरोपी हा अवैधरित्या दारु विक्री करीत असल्याने त्याचे कृत्य हे कलम ६५ (ई) मदाका प्रमाने होत असुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

## जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. कोतवाली | अप . क्र. ४५१ / २०२४ कलम १२ अ जुगार कायदा | जुगार | एक वरली मटका आकडे लिहीलेली चिठठी , एक डॉट पेन कि अं १०/- नगदी , ८७०/- रु व १ विवो कंपनीचा y३३s, गे रंगाचा मोबाइल कि अं १०,०००/- असा एकुण १०८८०/- रु चा मुददेमाल | ऑटो गल्ल्ी युनुस चे कॅन्टींग समोर अमरावती | दिनांक १८/११/२४ चे १३.५० वा | दाखल वेळ दिनांक १८/११ /२४ चे १७.५३ वा | पोहेका दिपक श्रीवास ब नं २९६ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | १ कुणाल प्रदीप मिश्रा वय २७ रा विलास नगर गल्ली नं २ अमरावती , २ निलेश रामदास केणे वय ५३ रा गोपाल नग र अमरावती समन्सपत्रावर रिहा | | पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना १३.५० वा फोनव्दारे माहीती मिळाली की दोन इसम ऑटो गल्ली युनुस चे कॅन्टींग समोर मोबाइलवर १ ते १० वरली मटक्याचे आकडे घेवुन हारजीतचा खेळ चालवित आहे अशा माहीती वरुन २ पंच घेवुन ऑटोगल्ली येथे गेलो असता दोन इसम मोबाइलवर १ ते १० वरली मटक्याचे आकडे घेवुन हारजीतचा खेळ चालवित असल्याचे मिळुन आल्याने त्यांच्यावर रेड करुन त्यांना नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव १ कुणाल प्रदीप मिश्रा वय २७ रा विलास नगर गल्ली नं २ अमरावती , २ निलेश रामदास केणे वय ५३ रा गोपाल नग र अमरावती असे सांगीतले त्यांची अंगझडती घेतली असता पंचासमक्ष एक वरली मटका आकडे लिहीलेली चिठठी , एक डॉट पेन कि अं १०/- नगदी , ८७०/- रु व १ विवो कंपनीचा y३३s, ग्रे रंगाचा मोबाइल कि अं १०,०००/- असा एकुण १०८८०/- रु चा मुददेमाल मिळुन आल्याने जागीच जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करुन ताब्यात घेतले वरील दोन्ही आरोपीतांचे कुत्य कलम १२अ मजुका प्रमाणे होत असल्याने फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | करुन तपासात घेतला. |

## अकस्मात मृत्यु :- ०२

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | भा.द.वी. | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मर्ग नं ४८/२४ कलम १९४ भा ना सु सं २०२३ | कलम १७४ जा. फौ. | जळका शहापुर ते सावर्डी रोड दरम्यान १८-११-२४ चे १६-३० वा पुर्वी<br><br>दा १८-११-२४ चे २२-१३ वा | धंनजय नामदेव मेश्राम वय ५५ वर्ष रा जळका शहापुर ता जि अम | देवानंद गोतम वासनिक वय ५९ वर्ष रा जळका शहापुर ता जि अम | अति दारु चे सेवनामुळे मृत्यु | हकिकत असा प्रकारे आहे कि यातील मृतक हा फि याचा मावस भाऊ असुन तो पंधरा दिवसा पासुन एक सारखा दारु पित होता आज दि १८-११-२४ रोजी १०-०० वा दवाखान्यात जातो असे सांगुन घरी निघुन गेला नमुद .घ.ता.वेळी व ठिकान्ी सावर्डी येथील जनावरे चारनारे ईसम याने फोन करुन सांगीतले कि तुमचा भाऊ हा कारखान्या जवळ दारु पिवुन झोपला आहे त्यावेळी तेथे फिर्यादी व नातेवाईकानी जावुन पाहीले असता तो मरण पावला होता त्याचे मरणा बाबत कोणालाही काही शंका नाही अशा फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. | |